# नदीतील घोंगडी

*ईशा सरदेसाई यांच्याद्वारे पुनर्लिखित*

नदीचा प्रवाह अतिशय वेगाने वाहत होता, तिचे पाणी मार्गात येणाऱ्या खडकांवर आदळत होते, इतस्ततः पसरत होते, परंतु अन्यथा ती अव्याहतपणे वाहतच होती. दोन माणसे — दोघेही युवा — या नदीच्या काठावर उभे राहून धास्तावलेल्या नजरेने पाण्याकडे निरखून पाहत होते. त्यांना नदी ओलांडून पलीकडे तर जायचे होते, पण जावे तरी कसे?

काही तासांपूर्वी हे दोघे तरूण त्यांच्या त्या समूहापासून अलग झाले होते, ज्यांच्याबरोबर ते हायकिंगसाठी [पायी-पायी लांबवरच्या भटकंतीसाठी] निघाले होते. ते उत्तर अमेरिकेच्या एका दूरवरच्या भागात — कॅनेडीयन वाईल्डरनेस नावाच्या घनदाट जंगलांमध्ये कुठेतरी होते. ते आपल्या मित्रांपर्यंत किंवा आपल्या पडावाकडे जाणाऱ्या एखाद्या परतीच्या मार्गाच्या शोधात होते आणि थकलेले असल्याने अत्यंत कष्टपूर्वक पाय ओढत चालत जात होते. शेवटी ते इथे नदीकाठी येऊन पोहोचले होते.

त्या माणसांपैकी एका व्यक्तीने, रेमीने आपले बूट काढले आणि त्याच्या पायाचा अंगठा पाण्यात बुडवला. त्याच्या अंगावर शहारा आला. पाणी थंडगार होते.

त्याने आपले जास्तीचे कपडे उतरवण्यास सुरुवात करत आपल्या मित्राकडे पाहिले.

“लिऑन, तू तयार आहेस ना?” तो म्हणाला.

लिऑन शांतपणे पाण्याकडे एकटक पाहत होता. त्याचा चेहरा पांढराफटक पडला होता. त्याचे ओठ भीतीने कापत होते.

रेमीने हळूच त्याचा हात स्वतःकडे खेचला. “चल ये आता. हा प्रवास काही सोपा नसेल, पण तो तू करू शकतोस. तुला पोहता येते.”

लिऑनने एक शब्दही न बोलता आपली मान डोलावली, त्याचा चेहरा अजूनही भीतीने पांढराफटक पडलेला होता. आणि मग त्या दोघे एकत्र पाण्यात उतरले. त्वरितच पाण्याच्या लाटांचा परिणाम झाला. लाटांनी त्या दोघांच्या शरीरांना नदीच्या प्रवाहाच्या दिशेने ढकलले.

रेमीने स्वतःची सगळी ताकद पणाला लावत आणि स्वतःचे संपूर्ण धैर्य एकवटत आपल्या एका हाताने पाण्यावर प्रहार केला आणि मग दुसऱ्या हाताने. त्याने आपले पाय मागील बाजूस जोरजोराने मारायला सुरुवात केली. अशा तऱ्हेची हालचाल तो पुन्हापुन्हा करत राहिला. तो आपल्या फुफ्फुसांमध्ये हवा भरत हातपाय मारत राहिला आणि अखेरीस काही मिनीटांच्या पराकाष्ठेच्या परिश्रमांनंतर त्याला असे जाणवले की, आता त्याची पोहण्याची एक तालबद्ध लय स्थिरावते आहे. आपण संतुलित आहोत अशी जाणीव त्याला पुन्हा झाली; त्याचे शरीर पाण्याच्या प्रवाहासह वाहू लागले. प्रवाहाचा ओघ कसा आणि कुठल्या दिशेला आहे याकडे लक्ष दिल्यामुळे व त्यानुसार स्वतःच्या हातपायांची लय नियंत्रित केल्यामुळे त्याला जाणीव होऊ लागली की, तो प्रवाहाच्या ओघाशी जमवून घेऊ शकतो आहे. *होय तर,* त्याने विचार केला. *होय, मी हे निश्चितच करू शकतो.*

आणि जेव्हा त्याने स्वतःवरून लाटांना वाहून जाऊ दिले, तेव्हा त्याला इथे-तिथे काही ठिकाणी उबदारपणा जाणवला. एकदा पुन्हा त्याच्या दृष्टीचे क्षेत्र विस्तारित झाले, आता त्याला स्वतःच्या आजूबाजूला वाहणाऱ्या पाण्याच्या लाटांपलीकडे, ते सर्व मार्ग दिसले जे नदी पार करण्यासाठी त्याच्यासमोर होते. तिथे काही भाग असे होते की जे अधिक उथळ वाटत होते, असे काही भाग जिथे पाण्याचा प्रवाह शांत असल्याचे भासत होते.

“लिऑन,” तो म्हणाला. “तुला ते दिसते आहे का?” असे म्हणत रेमीने आपल्या सहकाऱ्याच्या शोधार्थ आजूबाजूला पाहिले. जेथे पाण्याचा प्रवाह अधिक शांत आहे अशा स्थानांपैकी एखादे स्थान आपल्या मित्राला दाखवावे असे त्याला वाटत होते.

परंतु — लिऑन मात्र कुठेच दृष्टीस पडत नव्हता.

“लिऑन!” रेमीने पुन्हा मोठ्याने हाक मारली, यावेळी मात्र तो घाबरला होता. “लिऑन, तू कुठे आहेस?” त्याने सर्वत्र पाहिले, त्याचे पाय अजूनही पाण्याखाली बेफामपणे आपले काम करत होते. पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे फेस तयार होत होता. तिथे कुणाचाही मागमूस नव्हता.

शेवटी, युगानुयुगे लोटल्याचा भास करवून देणाऱ्या वेळेनंतर, त्याला दूरवरून कुठुनतरी एक क्षीण आवाज ऐकू आला.

“रेमी — रेमी, तू तिथे आहेस का?”

“लिऑन! तो तूच आहेस का?”

रेमीने शक्य तेवढ्या जलद गतीने आवाजाच्या दिशेने पोहायला सुरुवात केली. लवकरच तो अशा एका स्थानी आला जिथे नदीला वळण मिळत होते. आणि तिथे लिऑन होता, त्याने पाण्याबाहेर डोकावणारा एक विशाल खडक घट्ट धरून ठेवलेला होता व त्याचे पाय बेभानपणे हेलकावे खात होते. असे वाटत होते की, जणूकाही नदीच्या लहरीनुसार आणि नियंत्रणानुसार त्याचे शरीर वरखाली, एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे डोलत होते.

“लिऑन!” त्याने जोराने हाक मारली. “काय करतो आहेस तू?”

लिऑनने डोके वर केले आणि त्याने आपल्या मित्राला पाहिले. “रेमी!” त्याने प्रत्युत्तर दिले. त्याचा आवाज खूपच दुःखी होता. “मी हे असे काहीच करू शकत नाही!”

“काय म्हणायचे आहे तुला?” रेमी त्याच्यावर ओरडला. “पोहत राहा, लिऑन! ते काही इतके अवघड नाही, माझ्यावर विश्वास ठेव.”

“नाही, नाही, शक्यच नाही ते. किती भयंकर कल्पना होती ही,” लिऑन कण्हत म्हणाला. पाण्याचा एक जोरदार हबका त्याच्या तोंडावर बसला.

“लिऑन, माझे म्हणणे ऐकून घे. . . ”

पण लिऑनने ऐकलेच नाही. “माझा यावर विश्वासच बसत नाही की, हे करण्यासाठी तू माझे मन कसे काय वळवलेस. . .” तो म्हणाला.

“लिऑन — तू फक्त *पोहत राहा!*”

*त्याला म्हणायला सोपे आहे!* लिऑनने स्वतःशी विचार केला. *तो तर पट्टीचा पोहणारा आहे.* लिऑनने स्फुंदत- स्फुंदत रडायला सुरुवात केली, पाण्याचे तडाखे त्याला कधी इकडे तर कधी तिकडे घेऊन जात होते.

त्याचवेळी लिऑनने पाहिले की, पाण्याच्या पृष्ठभागावरून काहीतरी अतिशय वेगाने त्याच्याकडे वाहत येत होते, परंतु ते काय आहे हे मात्र स्पष्टपणे दिसत नव्हते. ते एक मोठे, तपकिरी, जाड केसांनी आच्छादलेले असे काहीतरी होते.

“रेमी, रेमी — पाहा!” तो उत्तेजित होऊन म्हणाला. “आपण नदी ओलांडून जाण्यासाठी याचा उपयोग करू शकतो.”

प्रवाहात वाहून जाऊ नये म्हणून रेमीने पोहणे सुरूच ठेवले होते, त्यामुळे वेगाने वाहणाऱ्या या वस्तूकडे त्याचे लक्षच नव्हते. पण आता ती वस्तू जेव्हा लिऑनकडे जाऊ लागली, तेव्हा ती अधिक स्पष्ट दिसावी म्हणून त्याने डोळे बारीक करून त्याकडे पाहण्याचा प्रयत्न केला.

“मला याच्याबद्दल काहीच कल्पना करता येत नाही. . .” क्षणभरानंतर तो म्हणाला.

परंतु लिऑन त्या मोठ्या तपकिरी गाठोड्याकडे आधीच पोहोचलेला होता. “मला वाटते आहे की, ती एक घोंगडी आहे!” तो ओरडला.

“काय?” रेमी म्हणाला. “घोंगडीवर बसून एखाद्याने नदी पार केल्याचे माझ्यातरी ऐकिवात नाही. चल ये लिऑन, आपण आपले पोहत राहणेच बरे.”

परंतु, त्याच्या शब्दांचा परिणाम इतकाच होता की, जणूकाही रेमी पाण्याशीच बोलतो आहे. लिऑन धडपडत घोंगडीवर चढण्याच्या प्रयत्नात मग्न होता. त्याचे पाय काही वेळा घसरत होते, पण सरतेशेवटी त्याने स्वतःला त्याच्यावर स्थिर केले. त्याने त्या वस्तूच्या घड्यांना आपल्या हातात घट्ट पकडले.

आणि फक्त थोडाच वेळ तो घोंगडीवर जीव मुठीत घेऊन बसलेला असतानाच त्याचे शरीर घोंगडीच्या गुंता झालेल्या, घनदाट लोकरीमध्ये खोलवर बुडू लागले. त्याने एक दीर्घ पण हळुवार सुटकेचा निःश्वास सोडला. *ओफ्फऽऽऽऽऽऽऽऽऽ* आता तो सुरक्षित होता.

खरे तर, त्याला आपल्या घोंगडीवर खूपच सुरक्षित, खूपच निर्धास्त झाल्यासारखे वाटले होते. त्यामुळे त्याच्या हे लक्षातच आले नाही की, अजूनही तो प्रवाहाच्या खालच्या दिशेनेच कसा वाहत जातो आहे — आणि तेही इतक्या वेगाने. त्याच्या हेदेखील लक्षात आले नाही की, ती घोंगडी त्याच्या अपेक्षेप्रमाणे वाहूदेखील शकत नव्हती किंवा मग ती पाहिजे तेवढी स्थिरदेखील नव्हती.

सुरुवातीला त्याला त्याच्या खालच्या बाजूला केवळ एक हळुवार पुढेमागे होत राहणारी हालचाल जाणवत होती — एखाद्या मनुष्याला पाण्यावरील तराफा चालवताना जाणवते तशी. पण नंतर प्रवाह जसजसा अधिक तीव्र झाला, तसतशी त्याची प्रतिक्रिया म्हणून ती घोंगडी जोरजोराने हलत होती, आणि तिचे काही भाग नदीच्या पृष्ठभागाखाली पूर्णपणे बुडत होते.

आणि ती घोंगडी जितकी इकडून तिकडे अधिक जात होती, तितकाच लिऑनदेखिल तिला अधिक घट्ट चिकटून बसत होता. त्याने घोंगडीभोवती आपले पाय घट्ट आवळून धरले, आपल्या हाताने तिला मिठी मारली आणि त्याच्यामध्ये आपले संपूर्ण शरीर घुसवून टाकले.

रेमी, जो अजूनही प्रवाहाच्या वरच्या बाजूला होता, भयग्रस्त होऊन हे सर्व घडत असताना पाहत होता. "लिऑन!" तो ओरडला. "कृपा करून माझे ऐक. ती घोंगडी सोडून दे!"

लिऑनने काहीच प्रतिसाद दिला नाही. तो आतापर्यंत त्या घोंगडीशी खूपच झगडत होता; असे वाटत होते की, जणू तो त्या घोंगडीशी झुंजतो आहे. पाण्याच्या लाटा लिऑनच्या आणि घोंगडीच्या वरून वाहत होत्या आणि गिरक्या घेत होत्या — आणि मग ते दोघे पाण्याच्या पृष्ठभागाखाली दिसेनासे होत राहिले आणि काही क्षणानंतर पुन्हा दृष्टीस पडत राहिले.

"फक्त ते सोडून दे!" रेमी मोठ्याने ओरडला.

सरतेशेवटी, लिऑन बोलला. "मी त्याला सोडूच *शकत नाही!*" तो विलाप करत म्हणाला.

"तू सोडू शकत नाही, म्हणजे काय?"

"ती घोंगडी — ती घोंगडी नाही," त्याने हतबलतेने प्रत्युत्तर दिले.

“मग ते आहे तरी काय?!”

“ते एक अस्वल आहे, रेमी! आणि ते मला त्याच्या पकडीतून सोडायलाच तयार नाही.”

© २०१९ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.